सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता उर्वरित व्यवस्थापकीय अनुदान, ३६ सहायक अनुदाने (वेतन) मंजूर करण्याबाबत.
वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित)

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक- वनाम-२०१८/प्र.क्र. ६१/महामंडळे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २६.०३.२०१९

संदर्भ :- १. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २५.०१.२०१९
३. शासन निर्णय, समक्रमांक दि. ०४.०६.२०१८

शासन निर्णय :-

वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे मार्फत विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येतात. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता महामंडळामध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनावरील खर्च भागविण्याकरीता ३६- सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु. ७,८१,१८,०००/- (अक्षरी रुपये सात कोटी एक्याऐंशी लक्ष अठरा हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. मंजूर अनुदानाच्या ७० टक्के रु. ५,४६,८२,०००/- (अक्षरी रुपये पाच कोटी सेहेचाळीस लक्ष ब्याऐंशी हजार फक्त) उपरोक्त दि. ०४.०६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आले आहे. आता, उर्वरित रु. २,३४,३६,०००/- (३० टक्के) इतके अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

०२. वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) या महामंडळास वेतनावरील खर्च भागविण्याकरीता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता अर्थसंकल्पीय तरतुदींपैकी संदर्भीय दि. २५.०१.२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार एकूण मंजूर अनुदानाच्या ३० टक्के मर्यादेत जानेवारी, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीकरीता एकूण रु. २,३४,३६,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी चौतीस लक्ष छत्तीस हजार फक्त) एवढे सहायक अनुदान खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.-

१. योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.
२. व्यवस्थापनावरील खर्च मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने कामकाजात सुसूत्रता आणावी.
३. विविध बाबींवर खर्च केलेल्या रकमांची तपशीलवार माहिती व त्यावर केलेला खर्च याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.
४. कार्यालयीन खर्चात काटकसर करावी.
५. महामंडळाने कर्जाच्या वसुलीचे प्रमाण प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करावेत.
६. सदर योजनेचा निधी उपयोगिता प्रमाणपत्रे तपासण्याच्या अधीन वितरीत करण्यात येत आहे.

०३. उपरोक्त निधीचा खर्च करतांना संबंधित अधिकाऱ्यांनी सर्वसाधारण वित्तीय नियम, योजनेच्या अटी व शर्ती, CVC मार्गदर्शक सूचना, CAG निरीक्षणे इ. अनुपालन करून निधीचा विनियोग करावा.

०४. संदर्भ क्र. १ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रकातील सूचना व सोबतच्या तपासणी सूचीमध्ये नमुद केल्यानुसार प्रत्येक अटींची पुर्तता महामंडळाकडून करण्यात आली आहे.

०५. तसेच वित्त विभागाच्या निर्देशानुसार वेतन अनुदान अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये ECS द्वारे प्रदान करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत वेतन अनुदानाची रक्कम एकत्रितरित्या व offline पध्दतीने वितरीत करण्यात येऊ नये.

०६. वरील अनुदानाबाबत सह सचिव/ उप सचिव (अर्थसंकल्प), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम आहरित करण्यासाठी, अवर सचिव (अर्थसंकल्प), आहरण व संवितरण अधिकारी, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांस संवितरीत करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

०७. याबाबीवर खर्च मागणी क्र. झेडजी-३, (०२) विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळाला अनुदान, (०२) (०१) विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ (अनिवार्य) २२२५ई८४८, ३६, सहायक अनुदाने (वेतन) या लेखाशिर्षाखली खर्ची टाकून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागवावा.

०८. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२.०४.२०१८ व दि. २५.०१.२०१९ अन्वये दिलेल्या अधिकारीतेत निर्गमित करण्यात येत आहे.

०९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२६१७०४१९५४२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shri Ravindra Gurav
Date: 2019.03.26 17:10:34 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
२. सह सचिव /उप सचिव (अर्थसंकल्प) , विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, कोकण भवन, नवी मुंबई
४. व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई.
५. महालेखापाल (ले व अ) महाराष्ट्र -१ व २, मुंबई/नागपूर
६. महालेखापाल (ले.प.) महाराष्ट्र -१ व २, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / जिल्हा कोषागार अधिकारी मुंबई /ठाणे
८. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
९. अप्पर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई
१०. वित्त विभाग (का- व्यय-१४/अर्थौपाय/अर्थसंकल्प-३/साउ) मंत्रालय, मुंबई
११. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई
१२. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती (महामंडळे).